
REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 10 | ISSUE - 12 | SEPTEMBER - 2021

# संत श्री तुकाराम महाराजांच्या गाथेतील भक्तियोग

**वामन रामराव वैद्य**
**सहयोगी प्राध्यापक व विभाग प्रमुख, इतिहास स्वामी विवेकानंद वरिष्ठ महाविद्यालय,**
**मंठा, जि. जालना, महाराष्ट्र.**




**प्रस्तावना:-**

महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे ज्ञानदेवांपासून संत तुकारामांपर्यंत संतांची समृद्ध परंपरा महाराष्ट्राला लाभली आहे. या परंपरेने मराठी भाषेलाही ही समृद्ध केले आहे.

"ज्ञानदेवे रचिला पाया ।
तुका झालासे कळस ।

अशा शब्दात संत बहिणाबाईंनी ही परंपरा मांडली आहे. संत तुकाराम महाराज हे संत श्रेष्ठ आहेत. समाज सुधारक आहेत. आणि कवी श्रेष्ठ आहेत. त्यांनी आपल्या आचार विचारातून अवघ्या मनुष्यमात्राच्या सर्वांगीण उन्नतीचा मार्ग दाखविला. त्यामुळे त्यांची अभंगवाणी अवघ्या महाराष्ट्राच्या हृदयात घर करून राहिली आहे. त्यांनी आपल्या अभंगवाणीतून मानवतावादी उदात्त मूल्यांची शिकवण दिली.

" वेदाचा तो अर्थ आम्हासीच ठावा /
येरांनी वाहवा भार माथा /

असा अध्यात्मिक अधिकार त्यांनी आपल्या शुद्ध आणि पवित्र आचरणातून प्राप्त करून घेतला होता. "बुडती हे जन न देखवे डोळा /येतो कळवळा म्हणोनिया /

या दृष्टीने त्यांनी अभंग रचना केली; आणि लोकांना भक्तिचा मार्ग दाखविला. त्यामुळेच संत महिमा, नाम महिमा, कीर्तन महिमा, पंढरी महात्म्य, विठ्ठल महिमा, तुळशी महात्म्य इत्यादी विषयी त्यांनी आपल्या अभंगातून रसाळपणे गायलेले आहेत.

**उद्दिष्टे:-**

*संत तुकारामांची भक्ति योगा विषयीची संकल्पना समजून घेणे.
*संत तुकारामांनी सांगितलेली भक्त लक्षणे समजून घेणे.
* संत तुकारामांची मोक्ष कल्पना पाहणे.
* संत तुकारामांनी गायलेले विठ्ठल महात्म्य आणि पंढरी महात्म्य समजावून घेणे.

## विषय- विवेचन

या मध्ये आपणास प्रामुख्याने संत तुकारामांचा भक्तियोग पहावयाचा आहे. देव- भक्त यांच्यातील अव्दैत भक्तांची आणि अभक्तांची तुकारामांनी सांगितलेली लक्षणे, त्यांची मोक्ष कल्पना, त्यांनी गायलेले पंढरी महात्मे, विठ्ठल महात्मे या सर्वातून त्यांचा भक्तियोग आपणास समजून घेता येईल.

भागवत धर्म विचार परंपरेत चार पुरुषार्थांची साधना फार प्राचीन काळापासून महत्त्वाची मानली आहे. ते चार पुरुषार्थ म्हणजे धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष. यापैकी मोक्ष या चौथ्या पुरुषार्थाचे महत्व आणि श्रेष्ठत्व अनेक ज्ञानी पुरुषांनी सांगितलेले आहे. मात्र संतादी (प्रामुख्याने वारकरी सांप्रदायिक संतांनी) मुक्ती पेक्षा भक्ती ला महत्त्व दिलेले आहे. म्हणजेच ज्ञानाला महत्त्व दिले नाही असे नाही तर
नामदेव महाराज म्हणतात,
"भक्तीविण मोक्ष /नाही सिद्धांत"/
भक्तिमार्गाचे मूळ भगवद्गीता आणि भागवतपुराण यामध्ये आढळते. मराठी संतकवींनी सगुण निर्गुणाचा समन्वय साधत
"भक्तिपंथ बहु सोपा / पुण्य ना गवे या पापा "/ म्हणून त्यांचा पुरस्कार केला आहे. संत तुकारामांना या मार्गाचे कळस होण्याचे भाग्य लाभले. श्री तुकाराम महाराजांनी भक्ती हाच सर्व पुरुषार्थाचा मुकुटमणी असून परमार्थातील इतर सर्व मुक्काम अलीकडचे आहेत असे म्हटले आहे.

## देव-भक्तांचा अभेद

भगवंतच जगद्रूपाने नटलेला आहे. त्यामुळे देव आणि भक्त दोघे एकच आहेत. देव- भक्त- गुरू या सर्वांच्या रूपाने एक विठ्ठलच विनटला आहे. असा तुकारामांचा साक्षात्कार आहे. सर्वच मराठी संतांनी हा विचार पुन: पुन्हा सांगितलेला दिसतो. माझ्या विठोबाचा कैसा प्रेमभाव "आपणचि देव होय गुरु" अशा शब्दात तुकारामांनी देव भक्तांचे अद्वैत सांगितलेली आहे. भक्ताला भगवंताचा ध्यास असतो तर भगवंताला भक्ताची ओढ असते.

भक्ती विण देवा । कैचे रूप घडे सेवा ।।१
शोभाविले येरयेरां । सोने एके ठाई हीरा ।।२
देवाविण भक्ता । कोण देता निष्कामता ।३
तुका म्हणे बाळ । माता जैसे स्नैहजाळ ।।४

भक्त आहेत म्हणून देव आहे आणि देव आहे म्हणून भक्त आहेत. देव भक्तांचे नाते परस्परावलंबी आहे. सोन्याच्या कोंदणात हिरा जसा असतो. तेथे हिरा आणि सोने यांनी एकमेकाला सुशोभित केलेले असते. तसे देव भक्तांचे नाते आहे. फक्त नसेल तर देवाला देवत्व कसे प्राप्त होईल. आणि देवाशिवाय भक्ताला निष्कामता( मोक्ष)¿ कशी प्राप्त होईल म्हणून परमार्थामध्ये विरक्ती, भक्ती वैराग्याला फार महत्त्व आहे . देवा शिवाय भक्तांना देवत्व प्राप्त कसे होईल आणि निष्कामता म्हणजे मोक्ष कोण प्राप्त करून देणार. देव आणि भक्त यांचे नाते आई आणि मूल असे आहे व हे नाते मधुर आणि प्रेमळ आहे.

संत तुकारामांच्या मते ईश्वर आणि भक्तांचे नाते अनन्य असते. भक्तामुळे देवाला आणि देवामुळे भक्ताला सार्थकता येते. देव आणि भक्त एकमेकात सामावून गेलेले असतात. त्यांना वेगळे करता येत नाही. ते दिसायला दोन असले तरी असायला एकच असतात. हा विचार तुकोबांनी पाणी आणि तरंग, वस्तू आणि तिची छाया अशा उदाहरणाने स्पष्ट केला आहे. झाड आणि त्याचे बीज एकमेका सामावून गेले असते. पाणी आणि तरंग दिसायला वेगळे वाटले तरी ती एकच असतात. असे देव भक्तांचे नाते आहे ." संत तेची देव/ देव तेचि संत"संतांच्या विभूती देवच असतात देव आणि संत एकाच परब्रह्माचे भाग आहेत.

## भक्त आणि अभक्त

सर्वच मराठी संतांनी भक्त आणि अभक्त यांची लक्षणे सांगितली आहेत. संत लक्षणे हीच भक्त लक्षणे आहेत. सर्वाभूती भागवत् भाव, समता दृष्टी, दया-क्षमा-शांती , एकनिष्ठ भक्तिभाव ही खऱ्या भक्तांची लक्षणे आहेत. असे महात्मे निरपेक्ष वृत्तीने जगात संचार करीत असतात सोने रुपया मृतीके समान अशी त्यांची धारणा असते. रंजल्या-गांजल्या जीवावर प्रेम करणे पीडिता विषय अपार करुणा असणे ही महत्त्वाची भक्त लक्षणे आहेत. असा भक्त सर्वत्र समदृष्टीने पाहत असतो तुकोबा म्हणतात.

जे का रंजले गांजले । त्यासी म्हणे जो आपुले ।
तोचि साधू ओळखावा । देव तेथेची जाणावा ।
मृदु सबाह्य नवनीत । तैसे सज्जनाचे चित्त।
तुका म्हणे सांगू किती । तोचि भगवंताची मूर्ती।

सर्व भावाने जो देवाला शरण गेलेला असतो. कोणत्याही परिस्थितीत ज्याच्या बाबतीत खंड पडत नाही तोच खरा भक्त होय.” वैष्णव तो जया । अवघी देवावरी माया । पडता जड भारी । नेमा न टळे निर्धारी // . अशा शब्दात तुकोबांनी हा भाव व्यक्त केलेला आहे. भक्त सज्जनाच्या ठिकाणी कोणताही अवगूण नसतो. चंदनाच्या ठिकाणी सर्वत्र सुगंध असतो. परिसाचा कोणालाही कोणताही भाग हिन दर्जाचा नसतो. दिव्याच्या मागेपुढे कोठीही अंधार नसतो. साखर सदैव सर्वत्र गोड असते. त्याप्रमाणे

“तुका म्हणे तैसा / सज्जना पासून पाहता / अवगुण मिळेचिना /

सदाचार हा भक्तीचा आत्मा असतो. विठ्ठलाला शुद्ध भक्तिभाव आवडतो. भक्तीत जिव्हाळा प्रेम महत्वाचे आहे. अशी भक्ती कशी करायची हे ज्याला समजते तो मूर्तिमंत देवाचा पुतळाच होय नवविधा भक्ति जो जाणतो तोच खरा पवित्र होय. अशा भक्तांचा अंकित होऊन राहण्यात भगवंताला आनंद वाटतो.

जाणे भक्तिचा जिव्हाळा / तोचि देवाचा पुतळा //
आणीक नये माझ्या मना / हो का पंडित शहाणा //

असा भक्ती सुखाचा अनुभव स्वतःलाच घ्यावयाचा असतो. भावानेच भगवंताची प्राप्ती होते. केवळ अज्ञानाने नाही. भाव ज्याच्या जवळ असतो, तोच खरा वैष्णव - भक्त होय. भगवदभक्तीतील सुख आणि भगवंताच्या नामामृताची गोडी केवळ भक्त जाणू शकतात. आईच्या दुधाची गोडी तिच्या बाळाला समजते. गाईच्या दुधाची गोडी तिच्या वासरालाच कळते. परिमळाचा आनंद भ्रमरांनाच समजतो कमळाला नाही. त्याप्रमाणे हरिभक्ती ची गोडी हरीला समजत नाही ती हरी भक्तांना समजते. “कुमोदिनी जाणे काय परिमळ । भ्रमर सकळ भोगितसे /

अशा भक्तावर भगवंताचे ही आत्यंतिक प्रेम असते. कोणत्याही परिस्थितीत भक्त आपल्या भक्ती पासून ढळत नाही. असा भक्त तुकोबांना महत्त्वाचा वाटतो म्हणून अशा भक्ताचा मुक्तकंठाने गौरव करतात.

संत तुकारामा सारखे भक्तश्रेष्ठ मोक्षाची अपेक्षा करीत नाहीत भगवंताचे भक्त होऊन राहण्यात त्यांची कृपा संपादन करण्यात आणि त्यांच्याशी प्रेमाने गुजगोष्टी करण्यात अशा भक्तांना धन्यता वाटते या दृष्टीने पाहता तुकारामाचा विठ्ठलावरील प्रेमभाव अत्यंत विलक्षण

अलौकिक असा आहे त्यांना ब्रह्मज्ञान नको आत्मस्थिती भाव नको आहे तर मी भक्त तू देव / एसे करी हीच त्यांची इच्छा आहे. भगवंताच्या सगुण रूपाचा ध्यास तुकोबांना लागला आहे. तुकोबांच्या दृष्टीने भक्त म्हणून राहण्यातच आनंद आहे .

नको ब्रह्मज्ञान आत्मस्थिती भाव / मी भक्त तू देव ऐसे करी./ देवाच्या सानिध्यात राहण्यास तुकोबांना सुख वाटते. भक्ताचे हे महत्त्वाचे लक्षण आहे. हा आनंद व्यक्त करताना प्रसन्न आणि प्रेमळ शब्दात तुकोबा म्हणतात.

जाऊ देवाचिया गावा / देव देईल विसावा /
देवा सांगू सुख दुःख/ देव निवारील भूक /

संत तुकारामाच्या भक्तीचे मूळ सूत्र ‘सर्वाभूती भगवंत' हे आहे. भगवद्गीता हेच सांगते ‘वासुदेव सर्वम्,संत ज्ञानदेव भक्ति ची व्याख्या करताना म्हणतात. जे जे भेटे भूत / ते ते मानिजे भगवंत/ हा भक्ती योग निश्चित / जात माझा. भक्तीची ही सर्वव्यापक विश्वात्मक अवस्था तुकोबांनी या अभंगात व्यक्त केली आहे.

भक्तांचा आचार निर्मळ असावा यावर तुकारामांचा भर आहे. उत्तम भक्त भक्तीच्या नावाखाली भिक्षा मागत नाही. अशा पोट भरू भक्तांचा तुकोबांनी कडक शब्दात निषेध केला आहे. अशा सकाम भक्ताची परमेश्वर नेहमी उपेक्षाच करतो. अशी भक्ती म्हणजे व्यभिचार आहे.

भिक्षापात्र अवलंबिणे / जळो जिने लाजिरवाणे / ऐसियासी नारायण / उपेक्षीजे सर्वथा //
देवा पायी नाही भाव / भक्ती वरी वरी वाव //
समरपिला जीव / नाही तो व्यभिचार//

संत तुकोबारायांनी भक्ता बरोबर अभक्तांची लक्षणेही सांगितली आहेत. अशा ढोंगी भक्तावर कडाडून हल्ला केला आहे. अंतरंगा पेक्षा बहिरंगावर भर देणारे सोंगाडे हे पापी असून त्यांच्यामुळे खऱ्या धर्माचा लोक होतो. केवळ गंधाचा टिळा लावून आणि भगवी वस्त्रे परिधान करून वैष्णव होता येत नाही. तूकोबाराय म्हणतात.

एका बोटाची निशाणी / परिपाक नाही मनी //
तरी ते संपादिले सोंग / कारणावाचूनिया अव्यंग //
वैष्णवांचा धर्म / जग विष्णू नेणे वर्म //
अतिशय पाप / तुका सत्य करी माप //

कपाळावर गंधाची निशाणी लावून लोक स्वतःला वैष्णव म्हणून घेतात पण त्यांच्या ठिकाणी आत्मानुभूती ची परिपक्वता नसते. वैष्णवत्व अंगी न बांणता गंधाचे टीळे लावून वैष्णव म्हणून मिरविणे हे सोंग आहे. सर्वजग विष्णुमय आहे हे वैष्णव धर्माचे मुख्य रहस्य आहे. हे वर्म अशा ढोंगी भक्तांना समजत नाही. भगवी वस्त्रे परिधान करून वैष्णव साधू होता येत नाही. तसे पाहिले तर कुत्र्याचा रंग ही भगवाच आहे म्हणून त्याला साधू म्हणता येत नाही. केवळ जटा वाढवून दहा दिशांना फिरणे हे भक्तीचे लक्षण नव्हे. तसे पाहिले तर कोल्हा अशा वेशात कायमच असतो. जमिनीत गुहा करून राहणे हे साधू चे लक्षण नव्हे. कारण उंदीर सतत बिळातच असतो म्हणून त्याला साधू म्हणता येत नाही. अशा प्रकारे देहाला त्रास दिल्याने साधुत्व येत नाही. अशी व्यक्ती परमार्थाचे ढोंग करीत असते. अशा भक्तांचा तुकोबांनी निषेध

केला आहे. अंतकरणात परमेश्वराबद्दल तळमळ नसताना रानावनात जाऊन देहदंडन करणे तुकोबांना पसंत नाही. तुकाराम महाराजांच्या भक्ताची वर्णन करतात.

भगवे तरी श्वान सहज वेष त्याचा /
तेथे अनुभवाचा काय पंथ //
वाढवूनी जटा फिरे दाहीदिशा /
तरी जबुंवेशा सज्ज स्थिती //
कोरुनिया भूमी करिती मधी वास /
तरी उंदरास काय वाणी/ तुका म्हणे कासया करावे//

बाह्य ढोंग संपादून खरे भक्त होता येत नाही अध्यात्मात अनुभवाला महत्त्व आहे. हाच विचार तुकोबांनी सांगितला आहे.

"तांब्याचे नाणे न चले खऱ्या मोले"/ व गाढव शृंगारीले कोडे' या अभंगातून सांगितलेला आहे.

गुड गुडीची नळी तोंडात धरून मोक्ष साधू पाहणारे अनेक साधक आहेत. मध्यपान, भांग भुरका हीच त्यांच्या मोक्षाची साधने असतात. अध्यात्मिक वचने त्यांना मुखोद्गत असतात पण स्वतः मात्र विषयात रममाण झालेली असतात. आपणास शिष्याकडून सेवा धन मान मिळावा ही त्यांची इच्छा असते. अशा दांभिक साधूंचा तुकोबांनी अत्यंत कडक शब्दात निषेध केला आहे. तुकोबाराय वर्णन करतात.

"साधक झाले कळी / गुडगुडीची लांब नळी //
पची पडे मध्यपान /भांग भुरका हे साधन//
अभेदाचे पाठांतर / अतिविषयी पडीभर //
चेल्यांचा सुकाळ / पिंड दंड भंगपाळ//
सेवा मानधन / बरे इच्छेने संपन्न //
सोंगाड्या नरकाडी / तुका बोडोनिया सोडी//

अशा प्रकारे तुकोबांनी आपल्या अभंगातून भक्त आणि अभक्त, साधू आणि साधू यांची लक्षणे सांगितली आहेत. त्यामुळे सर्वसामान्य जनतेला साधू कोणता आणि अ-साधू कोणता, भक्त कोणता आणि अभक्त कोणता हे ओळखता येईल. व ढोंगी साधू कडून त्यांची होणारी फसवणूक बंद होईल. तुकोबांचे हे कार्य सामाजिक आणि धार्मिक दृष्ट्या फार महत्त्वाचे आहे. तुकोबांचा हा निर्धार आजही महत्त्वाचा आहे.

### विठ्ठल नाम

संत श्री तुकोबारायांनी विठ्ठल महिमा त्यांचा नाममहिमा, हरिकीर्तन, नामस्मरण, संत संग भूवैकुंठ पंढरी आणि आपले आराध्य दैवत पांडुरंग याबद्दलचे विवेचन तुकारामांनी अनेक अभंगातून केलेले आढळते. याचे एकरुप चित्र पुढील अभंगात दिसून येते.

कथा त्रिवेणी संगम / देव भक्त आणि नाम/
तेथीचे उत्तम / चरण रस वंदिता //१/
जळती दोषाचे डोंगर /शुद्ध होती नारी नर /
गाती ऐकती सादर / पवित्र हरिकथा//२/
तीर्थे तया ठाया / येती पुनीत व्हावया /
पर्वकाळ पायां / तळी बसे वैष्णवा //३/
अनुपम्य हा महिमा / नाही द्यावया उपमा /
तुका म्हणे ब्रम्हा /नेणे वर्णू या सुखा//४/

हरी कीर्तनामध्ये देव, भक्त आणि नाम असा दुर्लभ त्रिवेणी संगम असतो. हे हरी कथेचे खास वैशिष्ट्य आहे. जे पवित्र हरिकथा गातात आणि ऐकतात. त्यांच्या पापाचे पर्वत जळून जातात. हरिकीर्तनाची महती अशी आहे की तीर्थे ही पवित्र होण्यासाठी हरी कीर्तनाच्या ठिकाणी येऊन राहतात. म्हणून हरी कीर्तनाचा महिमा ब्रम्हा ही वर्णन करू शकत नाही. असे तुकोबाराय स्पष्ट सांगतात.

कलियुगामध्ये भगवंताचे नामस्मरण हा भगवंत प्राप्तीचा सुलभ व सोपा उपाय आहे. या संदर्भातील तुकारामाचा पुढील अभंग प्रसिद्ध आहे.

नाम संकीर्तन साधन पै सोपे / जळतील पापे जन्मांतरीची //
न लगती सायास जावे वनांतरा / सुखे येतो घरा नारायण //
राम कृष्ण हरी विठ्ठल केशवा / मंत्र हा जपावा सर्वकाळ //
याविणा असता आणिक साधन / वहातसे आन विठोबाची//
तुका म्हणे सोपे आहे सर्वाहुनी / शहाणा तो धनी घेतो येथे//

परमेश्वर प्राप्तीसाठी रानावनात जाण्याची आवश्यकता नाही. घरी बसूनच भगवंताचे आवडीने नामस्मरण केल्यास त्याची प्राप्ती सहज होते. म्हणून राम कृष्ण हरी विठ्ठल केशवा या मंत्राचा जप सर्व काळ करावा. नामस्मरणाला काळ वेळ याचे बंधन नाही. कोणताही विधी नाही सर्व मानवजातीचा उद्धार करणारा हा तारक मंत्र आहे. याशिवाय आणखी उत्तम साधन नाही अशी तुकोबा आपल्या परमप्रिय विठोबा ची शपथ घेऊन सांगतात. यातून त्यांचा नामस्मरणावरील दृढ विश्वास व्यक्त होतो. नामस्मरणाने वैकुंठाची प्राप्ती होते.

"कृष्ण विष्णू हरी गोविंद गोपाळ/ मार्ग हा प्रांजळ वैकुंठीचा" / अशी त्यांची ठाम मत आहे.

वारकरी संप्रदायाच्या आचारविचारांमध्ये नामस्मरणाला फार महत्त्व आहे. म्हणून भगवद् नामस्मरण सर्वांनी सर्वकाळ करावे. असा तुकोबांचा आग्रह आहे. म्हणून ते म्हणतात,

" घेई घेई माझे वाचे / गोड नाम विठोबाचे"
हरी नामस्मरणाने संसार रुपी मायाजाळ नाहीशी होते." हरी हरी तुम्ही म्हणा रे सकळ / येणे मायाजाळ तुटईल.//
विठ्ठलाचे स्मरण केल्याने संताना सुख होते.
आम्ही तेणे सुखी / म्हणा विठ्ठल विठ्ठल मुखी / किंवा "सेवा ते आवडी उच्चारावे नाम / भेदाभेद काम निवारूनि/

विठ्ठल नामोच्चार हीच भगवंताची खरी सेवा आहे. असे तुकोबा स्पष्ट करतात. मात्र भगवंताचे नाम आवडीने, प्रेमाने घेतले पाहिजे. भगवंताच्या नामावर विश्वास ठेवून नामस्मरण करणे हा वैष्णवांचा कुळधर्म आहे.'

आम्हा वैष्णवांचा कुळधर्म कळीचा /

विश्वास नामाचा एका भावे / हे विठ्ठलाचे नाम फुकटचे आहे. त्यासाठी काहीही खर्च करावे लागत नाही. "नाम फुकट चोखट / नाम घेता नये विटं//

संतांनी भक्ती मार्गाला राजयोग म्हटले आहे. भक्ती नवविधा असली तरी त्यात नामस्मरण अधिक महत्त्वाचे मानले आहे. म्हणून तुकोबा पुन: पुन्हा विठ्ठल नामाचा जयघोष करण्यास सांगतात. 'आणिक करावे श्रम / एक पुरे नाम विठोबाचे// 'भवनिर्दालन नाम // विठ्ठल विठ्ठल नाशी काम / विठ्ठल नामाने सर्व कामवासना नाहीशा होतात. नाम सर्वांना पवित्र करणारे आहे. म्हणून प्रयाग, काशी यासारखी तिर्थेही नामाची बरोबरी करू शकत नाहीत. 'सकळही तीर्थे प्रयाग काशी / करिता नामाशी तुळेतींना // हरी नामस्मरणाने जन्ममरणाची यातायात नाहीशी होते. भक्ती आणि मुक्ती दोन्ही प्राप्त होतात. 'हरि म्हणता भुक्ति हरी म्हणता मुक्ती / चुके यातायाती/ हरी म्हणता. नामस्मरणाने मोक्ष हातात येतो आणि पुराणात अनेकांची साक्षी आहे मुखी नाम हाती मोक्ष नामस्मरणाने कळिकाळावरही सत्ता गाजवीत येते. अशा प्रकारे तुकाराम महाराजांनी विठ्ठल महिमा, नाम महिमा, पंढरीमहिमा अनेक अभंगातून वर्णन केलेला आहे. हा विठ्ठल सर्वगुणसंपन्न आहे. तो कृष्ण आहे, शिव आहे, हरीहाराचे एकात्मरूप आहे. हा विठ्ठल षडगुण ऐश्वर्य युक्त आहे.

'तुका म्हणे जे जे बोला / ते ते साजे या विठ्ठला' ही विठाई माऊली अत्यंत प्रेमळ आहे.

विठ्ठल हे दैवत अशी सर्वव्यापक, सर्वशक्तिमान प्रत्यक्ष परब्रम्ह आणि समदृष्टी असणारे आहे. ते सर्वांचा उद्धार करणारे आहे. म्हणून तुकोबा सर्वांना विठ्ठल नामाची मात्र घेण्यास सांगतात, त्याच्या रूप वर्णनात रंगून जातात.

## पंढरी महात्म्य

वारकरी संतांच्या दृष्टीने पंढरी हे भूवैकुंठी आहे. ते सर्व तीर्थांचे माहेर आहे. सर्व तीर्थांना पवित्र करणारे ठिकाण आहे. पंढरी सर्व सुखाची ओवरी आहे. असे पंढरीचे वर्णन वारकरी संतांनी केलेले आहे. संत तुकाराम हे याच दृष्टीने पंढरीचे वर्णन करतात.

'धन्य ती पंढरी धन्य भीमातीर / आणियले सार पुंडलीके //
धन्य तोहि लोक अवघा दैवांचा / सुकाळ प्रेमाचा घरोघरी'//

पंढरीतील विठ्ठल नामाचा गजरा ऐकला की मनाला समाधान प्राप्त होते. येथील विठ्ठल मंदिराचा केवळ कळस पाहिला तरी तात्काळ मोक्ष मिळतो. असे तुकोबा आत्मविश्वासपूर्वक सांगतात.

'सर्वोत्तम तीर्थ क्षेत्र आणि देव / शास्त्राने हा भाव निवडीला //
विष्णुपद गया रामधाम काशी / अवघी पायापाशी विठोबाच्या //

पंढरीमध्ये संतांची भेट होते. सखा मायबाप विठ्ठल भेटतो. आणि त्यामुळे जन्ममरणाची येरझार खुंटते. पुन्हा संसारात यावे लागत नाही. म्हणून तुकोबांना पंढरीचे मोठे कौतुक वाटते. हा भाव वर्णन करताना तुकोबांची वाणी फुलून येते मन उल्हसित होते. पंढरी हे महा क्षेत्र असून या क्षेत्राला दुसरी उपवास नाही. येथील वारकरी धन्य आहेत.

'महाक्षेत्र हे पंढरी / अनुपम हिची थोरी / धन्य धन्य वारकरी / तुका म्हणे तेथीचे / जे काशी भागीरथी पेक्षा पंढरी श्रेष्ठ आहे तिर्थक्षेत्रे पांडुरंग चरणी वास करतात. कारण बाळकृष्ण विठ्ठलाच्या रूपात पंढरीत कायम निवास करून आहे. कोट्यावधी तीर्थ करून पंढरी पाहिली नसेल तर जीवन व्यर्थ आहे. विठ्ठलाचे समचरण पाहिले नसतील तर अनंत योगयोगही व्यर्थ आहेत. तुकोबाराय वर्णन करतात.

तीर्थे केली खोटी वरी / नाही देखिली पंढरी //
जळो त्याचे झालेपण / न देखेची समचरण//
योगयाग अनंत केले / नाही समचरण देखीले//
तुका म्हणे विठ्ठल पायी / आनंत तिर्थे घडली पायी //

जो परमात्मा अपार कष्ट करून अनंत काल तपश्चर्या करुनही प्राप्त होत नाही. तो विठ्ठलाच्या रूपाने प्रत्यक्ष पंढरीत आहे. म्हणून तुकोबाची वाणी गर्जना करून पंढरीचे महत्त्व वर्णन करते.

पंढरीची वारी महत्त्वाची मानली जाते नित्यनेमाने पंढरीची वारी करणारा तोच वारकरी होतो. त्यामुळे मराठी संतांच्या घराण्यात पिढ्यानपिढ्या पंढरीची वारी आणि विठ्ठलाची भक्ती चालत आलेली दिसते. ‘पंढरीची वारी आहे माझे घरी / आणिक न करी तीर्थव्रत // किंवा माझ्या वडिलांची मिराशी गा देवा / तुझी चरण सेवा पांडुरंगा // अशा शब्दात पंढरी आणि पांडुरंगा बद्दलचा आपला भक्तिभाव तुकोबांनी व्यक्त केलेला आहे. पंढरीची वारी तुकारामांची मिरास आहे. आमची मिरास पंढरी आमचे घर भीमातीरी अशा शब्दात तुकारामांनी आपली परंपरा सांगितली आहे.

पंढरी हे भूवैकुंठ आहे. तेथे सर्व काळ हरीचा वास असतो.
‘अवघी पंढरी भूवैकुंठ नगरी / नांदतसे श्रीहरी सर्वकाळ //

पुंडलिका मुळे श्रीविष्णू वैकुंठ सोडून पंढरीला आला म्हणून त्याच्या बद्दलची कृतज्ञता सर्व संता प्रमाणे तुकारामांनी ही व्यक्त केली आहे. अठ्ठावीस युगे पांडुरंगाला विटेवर उभे करण्याचे सामर्थ्य पुंडलिका च्या भक्तीत आहे कुंडलिकाच्या भक्तीत आहेपुंडलीक हा भक्तिचा आदर्श आहे. देव- भक्ताची अशी जोडी इतरत्र सापडणे कठीण आहे. तुकोबाराया अशाप्रकारे पंढरीचे वर्णन करतात. त्यात उत्कटता, सहजता व उस्फूर्तता आलेली आहे. त्यामुळे काव्य दृष्ट्याही हे वर्णन रमणीय वाटते. पंढरी सुखाची पेठ आहे तर पांडुरंग सुखाचे निधन आहे. म्हणून तुकारामाच्या या वर्णनात ही ब्रम्हानंद साठविला आहे.

### मोक्षसंकल्पना

वारकरी संप्रदायामध्ये चौथा आणि सर्वश्रेष्ठ पुरुषार्थ मानला आहे. संसारातून कायमची सुटका आणि परमेश्वर स्वरूपाची प्राप्ती म्हणजे मोक्ष होय. मानवाचा जन्म अशी मोक्षप्राप्ती करून घेण्यासाठीच आहे. मात्र मराठी संतांनी यापेक्षाही भक्ती श्रेष्ठ मानली आहे. कारण मुक्ती मध्ये भक्त वेगळेपणाने शिल्लक राहत नाही. आणि द्वेत नसेल तर भक्तीचा सोहळा उपभोगता येणार नाही. म्हणून संत मुक्तीला झिडकारतात. भक्ती सुखासाठी संतांनी काल्पनिक द्वेत मांनले आहे. मोक्षाच्या वा मुक्तीच्या अवस्थेत संतांना सुख वाटत नाही. त्यांना सुख आहे प्रभूचे रूप पाहण्यात, त्यांचे गुणाचे वर्णन करण्यात. त्यांच्या रूपाचे वर्णन करण्यात त्यांच्यावर रागावून यात त्याच्याशी प्रेम करण्यात त्याच्या भक्तांच्या संगतीत रमून जाण्यात त्यांना सुख वाटते. नामस्मरणात भजन-कीर्तनात गर्भवासाला न भिणारे व तो आवर्जून मागून घेणारे फक्त संतच आहेत.

मुक्तीची कल्पनाच तुकोबांना मान्य नाही. कारण बंधनच नसेल तर मुक्त कशाला म्हणावे. बंध आणि मोक्ष या सापेक्ष कल्पना आहेत. आत्मस्वरूप या दोघांच्या पलीकडील आहे. तेथे जन्म-मृत्यू ,नाश ,भय,या अवस्था नाहीत. अशाप्रकारे मुक्ती वरील भक्ती करणारे तुकोबा भक्त आहेत ते म्हणतात.

'मुक्त कासया म्हणावे / बंधन ते नाही ठेवे //
सूखे करितो कीर्तन / भय विसरले मन //
देखिजेना नाश / घालू कोणावरी खास //
तुका म्हणे साहे / देव आहे तैसा आहे //

सर्वात श्रेष्ठ असे भक्ति सुख तुकोबांना हवे आहे. वैष्णवांच्या घरी ऋद्धिसिद्धि हात जोडून उभ्या असतात. अशा वैष्णवांच्या घरी वास मिळावा ही तुकोबांची इच्छा आहे. म्हणून त्यांना जन्म घेणे चांगले वाटते. म्हणून तुकोबांनी मुक्ति देऊ नको अशी भगवंताला विनंती केली आहे. आणि यातूनच पक्षाचे स्वरूप सांगितले आहे.

### तुलसी महात्म्य.

तुळशी ही एक पूजनीय औषधी वनस्पती आहे. व विष्णूला प्रिय आहे. विठ्ठल हा श्रीकृष्णाचेच बालरूप असल्यामुळे त्याला तुळस अत्यंत प्रिय आहे. हा जगजेठी तुळशी माळ गळ्यात घालून विटेवर उभा आहे.

' तुळशी माळा घालुनी कंठी/ उभा विटेवरी जगजेठी'

### समारोप

संत तुकारामाची भक्ति ची संकल्पना आपण समजून घेतली. मोक्ष संकल्पना समजून घेतली सर्वच मराठी संत अद्वैतवादी आहेत. संपूर्ण चराचरात एक परमात्माच भरून राहिला आहे. असा सर्व संतांचा अनुभव आहे. तरीही भक्ति सुखासाठी संतांनी काल्पनिक द्वैत स्विकारले आहे. परमेश्वर सानिध्य आणि संत संगती या गोष्टी तुकोबांना महत्त्वाच्या वाटतात. अद्वैतातही भक्ति करता येते. भक्तिचा व्यवहार होतो. येथे देवच भक्त झालेला असतो. अशा भक्ती सुखासाठी देव वैकुंठ सोडून पंढरीला आला आहे. हा भाव तुकारामांच्या अभंगात व्यक्त होतो. यावेळी तुकोबांची वाणी उत्कट व उस्फुर्त बनते.

### संदर्भग्रंथ


- संत तुकाराम महाराज गाथा ,(संपा) देवडीकर
- 'जगद्गु रु श्री संत तुकाराम महाराज स्मारक ग्रंथ.(संपा)शैलजा ज्ञानेश्वर मोळक.
- संत तुकाराम महाराज,आ.ह.साळुंके